# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## पादुआचा संत अंतोनी नोव्हेना व सण

## १० ते १३ जून २०२४

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

**धर्मगुरू :** बंधू आणि भगिनीं म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

**प्रतिसाद : प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फ्रान्सिस, बिशप्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना ख्रिस्ताचे कार्य प्रभावीपणे करण्यास संत अंतोनीच्या मध्यस्थीने परमेश्वराची विशेष कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. संत अंतोनीने सुवार्तेच्या प्रसारासाठी स्वतःचे आयुष्य समर्पित केले. त्याच्या जीवनावरून प्रेरणा घेऊन ख्रिस्तसभेसाठी कार्य करण्याची प्रेरणा आपणांस लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. संत अंतोनीच्या मध्यस्थीने सर्व गरजवंतांच्या गरजा पूर्ण व्हाव्यात व आपणा प्रत्येकास परमेश्वराचा आशीर्वाद विपूल प्रमाणात लाभावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. परमेश्वराच्या कृपेने आपल्याला चांगले हवामान लाभावे, ह्या वर्षभरासाठी आपल्याला पुरेसा पाऊस मिळावा तसेच सर्व नैर्सगिक आपत्तीपासून आपले संरक्षण व्हावे म्हणून प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील सर्वांवर विशेषकरून जे आजारी आहेत, परगावात, परदेशात आहेत अशावर परमेश्वराचा आशीर्वाद असावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

**धर्मगुरू :** हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांच्या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणा-या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.